**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास**

एस. के. बोले. मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
महाराष्ट्र शासन नियंत्रित
फोन नं.-: २४२२४४३८ फॅक्स -: २४२२१५५८

**: जाहिर सुचना :**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात भाविकांनी "श्री"नां अर्पण केलेल्या सोने व चांदीच्या वस्तूंचे मुल्यांकन चक्रीय पध्दतीने करण्याकरीता सराफांचे पॅनेल तयार करावयाचे आहे. यास्तव शासन मान्यता असलेल्या नोंदणीकृत इच्छुक सराफांकडून दरपत्रके व कामाचे देकार सिलबंद लिफाफ्यातून मागविण्यात येत आहेत.

**देकार व दरपत्रके सादर करावयाची अंतिम तारीख गुरूवार ७ एप्रिल २०१६ सायंकाळी १६.०० पर्यंत आहे.**

**शनिवार दि. ९ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ११.३० वा. सिलबंद लिफाफे उघडण्यात येतील.** त्याबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) न्यासाची अधिकृत बेबसाईट www.siddhivinayak.org वर उपलब्ध आहे.

सही/—
संजीव पाटील
कार्यकारी अधिकारी

---

**Shree Siddhivinayak Ganapati Temple Trust**

S.K. Bole marg, Prabhadevi Mumbai 400028.
Phone No- 02224224438 Fax 02224221558
www.siddhivinayak.org Email: svt@vsnl.com

**Notice**

Sealed quotations are invited from qualified, approved and registered valuers who are interested in jewellery valuation of trust. Valuation of Ornaments donated to Lord Shree Siddhivinayaka by the devotees is to be done by the government recognized valuer. The jewellery contains gold and silver articles, some are studded with precious or/and semi precious stones. Valuation of jewellery is to be done by the trust through setting up panel of registered valuer on yearly basis.

**Last date of submission of request for proposal is Thursday, 7th April' 2016 up to 4.00 pm.**

**Sealed quotations shall be opened on Saturday, 9th April' 2016 at 11.30 am.**

Information, terms and conditions for the said can be seen and downloaded from the website www.siddhivinayak.org

Sd/-
Sanjeev Patil
Executive Officer

Date : 19th March' 2016
Place : Mumbai

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

एस. के. बोले. मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.
महाराष्ट्र शासन नियंत्रित
फोन नं.-: २४२२४४३८ फॅक्स -: २४२२१५५८
www.siddhivinayak.org Email: svt@vsnl.com


## शासन मान्यता असलेल्या नोंदणीकृत सराफांची चक्रीय पध्दतीने नेमणूक करण्याकरीता दरपत्रक अर्जाचा नमुना

| क्र | नमूना | |
|---|---|---|
| १ | सराफाचे व पेढीचे नाव, पत्ता व दुरध्वनीक्रमांक | |
| २ | पेढीच्या नोंदणी प्रमाणपत्राचा क्र. व वर्ष | |
| ३ | पॅन/वॅट/टिन क्र | |
| ४ | मागील तीन वर्षाची आर्थिक उलाढाल | |
| ५ | मुल्यांकनाचा १० वर्षाचा अनुभव असल्याची कागदपत्राची प्रत | |
| ६ | पेढीवरील कार्यरत असलेली कर्मचारी संख्या | कुशल कामगार<br>अकुशल कामगार |
| ७ | सनदी लेखापाल (C.A.) यांनी प्रमाणित केलेल्या मागील तीन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती | |
| ८ | सराफास मुल्यांकन करण्यास मिळालेल्या मान्यता प्रमाणपत्राचा नोंदणी क्र. व वर्ष | |
| ९ | मुल्यांकन कामापोटी दरमहा अपेक्षित मानधन (सर्व करांसहित) | |
| १० | मुल्यांकनासाठी पाठविण्यात येणाऱ्या कामगारांची संख्या | |

वर नमुद केलेली माहिती खरी व अस्सल असल्याचे मी प्रमाणित करीत आहे.

ठिकाण :–
दिनांक :–

पेढीचे मालक/अधिकृत प्रतिनिधी
यांची नामानिशी सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

एस. के. बोले. मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.

महाराष्ट्र शासन नियंत्रित

फोन नं.-: २४२२४४३८ फॅक्स -: २४२२१५५८

www.siddhivinayak.org Email: svt@vsnl.com


**शासन मान्यता असलेल्या नोंदणीकृत सराफांची चक्रीय पध्दतीने नेमणूकी करण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्ती**

न्यासाकडे जमा होणाऱ्या सोने व चांदीच्या खडेजडीत वस्तुंचे मुल्यांकन चक्रीय पध्दतीने करण्यासाठी शासन मान्यता असलेल्या नोंदणीकृत सराफांचे पॅनल बनविण्याकरीता पात्रतेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. मुल्याकंन करणारे सराफ हे शासन मान्यता असलेले नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२. मुल्याकंन सराफांना मुल्याकंनाचा कमीत कमी दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. मुल्याकंन सराफांस सोने व चांदीच्या कसाची, खडयांची तसेच दररोजच्या बाजारभावाची योग्य माहिती असणे आवश्यक आहे.

४. मुल्याकंनाकरीता लागणारे साहित्य सराफांनी स्वत: आणणे व उपलब्ध करणे आवश्यक असेल.

५. हुंडीतील जमा होणाऱ्या सोने व चांदीच्या वस्तुंचे मुल्यांकन न्यासाने ठरवून दिलेल्या दिवशी तसेच दररोज अभिषेक कक्षात जमा होणाऱ्या सोने व चांदीच्या वस्तुंचे मुल्यांकन दर आठवडयांनी करणे आवश्यक असेल.

६. मुल्याकंनाचा दरमहा अहवाल सादर करावा लागेल तसेच दर आर्थिक वर्षाच्या अखेरीस (मार्च नंतर) त्या आर्थिक वर्षाचा तपशीलवार हिशेब मुल्यांकनासह चार प्रतीमध्ये न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

७. सराफांनी स्वत: अथवा त्यांचेकडील सोने, चांदी व खडयांची पारख असलेल्या अनुभवी व जाणकार प्रतिनिधीस पाठविणे आवश्यक असेल.

८. मुल्यांकनासाठी पाठविण्यात येणारे प्रतिनिधी प्रामाणिक व उत्तम चारित्र्याचे असणे आवश्यक असेल.

९. तीन वर्षासाठी चक्रीय पध्दतीने निवड करावयाची असल्यामुळे आलेल्या अर्जामधून तीन सराफांची निवड केली जाणार आहे. केवळ दर कमी आहेत हाच निकष विचारात न घेता अन्य गुणवत्तेच्या बाबी विचारात घेऊन निवड केली जाईल.

१०. न्यासाला कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार असेल. दरपत्रक सादर करताना खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.

अ) मागील तीन आर्थिक वर्षातील उलाढालीची आकडेवारी व सनदी लेखापरिक्षकाचे लेखापरिक्षण अहवालाच्या प्रमाणित प्रती

ब) पॅन/वॅट/टिन क्रमांक

क) नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत

ड) राष्ट्रीयकृत बॅक/अनुसूचित बॅक व अन्य संस्था मुल्यांकनाचे काम केल्याबाबतच्या प्रती

इ) मुल्यांकनाकरीता पाठविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राच्या प्रती